मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 26 जुलै 2025 | पान- 1

# आरटीओमध्ये येणाऱ्या वाहनांचा सोसायटीधारकांना त्रास

## आरटीओच्या बाजूचे किरकोळ विक्रेत्यांचे अतिक्रमण, एजंटचा सुळसुळाट यांचाही त्रास

**पिंपरी | मनीषा थोरात- पिसाळ**

परिसरातील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) मध्ये टेस्टींगसाठी, फिटनेस साठी येणाऱ्या गाड्यांमुळे रहीवाशी सोसायट्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो आहे. आरटीओच्या बाजूचे किरकोळ विक्रेत्यांचे अतिक्रमण, एजंटचा सुळसुळाट यांचाही त्रास आहेच. महापालिका प्रशासनाने अनधिकृत अतिक्रमण आणि आरटीओने फिटनेस, टेस्टिंगसाठी येणाऱ्या गाड्यांची सोय वेगळीकडे करावी अशी मागणी नागरिकांकडून केली जाते.

मोशी प्राधिकरण सेक्टर ६ मध्ये आहे. आजुबाजूला तुलीप सोसायटी, सूर्यकिरण हौसिंग सोसायटी, साई हौसिंग सोसायटी, रिध्दी-सिध्दी संस्कृती, प्रगती एम्पाएर, जलवायू विहार, मोठी शाळा अभिषेक, भाजी मार्केट जवळच आहे. रहीवाशी परिसर असून या सोसायटीतील नागरिकांना गाड्यांचा मोठा त्रास सहन करावा लागतो आहे. अनेक दिवसांपासून फिटनेस आणि टेस्टिंगचे काम दूसरीकडे स्थलांतर करा अशी मागणी नागरिकांकडून केली जाते.



> आरटीओच्या चार ही बाजूला गाड्यांचा त्रास आहे. गुटखा खाऊन तिथेच थुंकने, मोठा आवाज, गाड्यांचे स्टीकरचा कचरा यासोबतच रस्त्याच्या कडेला लागलेल्या गाड्यांचा त्रास आहे. सोसायटीतील महिलांना या ठिकाणाहून बाहेर पडायचे म्हटले तरी अवघड आहे.फिटनेस आणि टेस्टिंगसाठी येणाऱ्या गाड्यांची सोय रहीवाशी परिसरात नसायला पाहिजे. स्थानिक नागरिकांची गैरसोय, महिलांची कुचंबना होते.
>
> **- निखिल काळकुटे, स्थानिक, सामाजिक कार्यकर्ते.**

> आरटीओला लागूनटे ऑफीस आणि जवळच घर आहे. ऑफीसला पार्किंग पण आरटीओच्या बाहेर गाड्यांचा गराडा असतो. आम्हाला तत्काळ काही कामासाठी बाहेर पडायचे म्हटले तर गाड्या अडव्या-तिडव्या लावल्याने कठीण जाते. टेस्टींग आणि फिटनेस चे काम लवकरात-लवकर दुसरीकडे शिफ्ट करावे. आमदार महेश दादा लांडगे यांच्याकडेही तक्रार केली. त्यानंतर त्यांनीही फोन करून सांगितले. मात्र परिस्थिती जैसे थे च आहे.
>
> **- विकास भोर, स्थानिक रहीवाशी.**

> आरटीओ मध्ये फिटनेस आणि टेस्टींगसाठी येणाऱ्या गाड्यांसाठी चिखलीत नव्याने होणाऱ्या पोलिस आयुक्तालयाच्या बाजूला कामकाज होणार आहे. त्याठिकाणी जागा मिळाली आहे. मात्र कामकाज पूर्ण होण्यास किमान दोन ते तीन वर्षे जातील. तोपर्यंत हा त्रास होणारच आहे. तात्पुरत्या स्वरूपात कुठेही स्थलांतर करू शकत नाहीत. कारण खूप मोठे हे कामकाज आहे. आजुबाजूच्या नागरिकांना त्रास होतो, त्यासाठी अनेक सोसायटीधारक आमच्याकडे तक्रार घेऊन आलेले.
>
> **- राहूल जाधव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी.**

---

# मोशीतील अंतर्गत रस्त्याची दुरवस्था

## अपघातांना जबाबदार कोण? मोशीतील नागरिकांकडून प्रशासनाला सवाल

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळ्यात खड्डयात पाणी साठल्याने अंदाज येत नाही. त्यामुळे दुचाकी स्वारांचे अपघात होतात. या अपघातांना जबाबदार कोण असा सवाल मोशीतील नागरिकांकडून प्रशासनाला केला जात आहे.

मोशीतील बनकरवस्ती रस्ता, वुड्सविले समोरील रस्त्याची दुरास्था अत्यंत दयनीय झाली आहे. रस्त्याची डागडुजी करून डांबरीकरण करणे आवश्यक असताना प्रशासनाकडून दुर्लक्ष होत आहे. पावसाळ्यात खड्डयात पाणी साठल्याने अंदाज येत नाही. त्यामुळे दुचाकी स्वारांचे अपघात होतात .या अपघातांना जबाबदार कोण असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.



> वुड्सविले समोरील रस्त्यांवर खड्डे आहेत, मात्र रस्त्याची जागा ताब्यात नसल्यामुळे खड्डे बुजविण्याचे काम प्रलंबित आहे. बनकरवस्ती मध्ये खड्डे बुजविले होते, पुन्हा एमएससीबी वाल्यांनी पुन्हा खोदल्याने खड्डे झाले आहे.
>
> **- नरेश जाधव, स्थापत्य विभाग.**

> परिसरातील अंतर्गत रस्त्यावरील खड्डयांची दुरावस्था झाली आहे. काही ठिकाणी गाड्या घसरून पडणे, खड्डयांचा अंदाज नसल्याने किरकोळ अपघात घडतात, त्यामुळे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन, या खड्डयांची दुरुस्ती करावी. ज्यामुळे नागरिकांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही.
>
> **- निलेश बोराटे, सामाजिक कार्यकर्ते.**

> अंतर्गत रस्त्यावरील खड्डयांच्या दुरावस्थेबाबत महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा झाली आहे. पाऊस उघडल्यावर दुरुस्ती करून घेतली जाईल असे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. त्यानुसार अंतर्गत रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी आम्ही पाठपुरावा करून हे काम मार्गी लावणार, नागरिकांचा त्रास कमी झाला पाहिजे. पावसाच्या पाण्यामुळे नागरिकांना खड्डयांचा अंदाज येत नाही. अपघात घडतात. त्यामुळे हे काम तत्काळ मार्गी लागणे आवश्यक आहे.
>
> **- निखिल बोऱ्हाडे, सामाजिक कार्यकर्ते.**

# अनधिकृत ‘होर्डिंग’वर महापालिकेचा हातोडा

## 24 होर्डिंग जेसीबीच्या साह्याने पाडले; पाहणीत आढळले 88 विनापरवाना जाहिरात फलक

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील चौकाचौकांत मोठ्या प्रमाणात असलेले विनापरवाना जाहिरात फलक आणि फ्लेक्सविरोधात महानगरपालिकेने कारवाई तीव्र केली आहे. आकाशचिन्ह आणि परवाना विभागाने शहरात पाहणी केली असून, यात 88 अनधिकृत जाहिरात फलक आढळले आहेत. यातील 24 जाहिरात फलक महानगरपालिकेने पाडल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली.



महापालिकेच्या हद्दीत कोणत्याही रस्त्यांवर किंवा भागांत जाहिरात फलक, फ्लेक्स उभारण्यासाठी महापालिकेच्या आकाशचिन्ह विभागाची परवानगी घ्यावी लागते. महापालिकेचे शुल्क भरून जाहिरात फलक उभारण्यासाठी मान्यता दिली जाते. यामधून महापालिकेला उत्पन्न मिळते. मात्र, शहरातील अनेक चौकांमध्ये, तसेच महत्त्वाच्या रस्त्यांवर महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता बिनधास्तपणे जाहिरात फलक उभारले जातात. यामुळे महापालिकेचे उत्पन्नही बुडते.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी शहरातील विविध भागांत उभारण्यात आलेल्या जाहिरात फलकांचा नुकताच आढावा घेतला होता. तसेच, शहरातील विनापरवाना असलेल्या जाहिरात फलकावर कारवाई करण्याचे आदेशदेखील दिले होते. त्यानुसार आकाशचिन्ह व परवाना विभागाने महापालिका हद्दीत असलेल्या अनधिकृत होर्डिंगची पाहणी केली. या पाहणीत शहरात 88 ठिकाणी विनापरवाना जाहिरात फलक आढळले.

15 क्षेत्रीय कार्यालयात घेतलेल्या शोध मोहिमेमध्ये नगररोड, वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालय - 35, हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालय-37, वानवडी रामटेकडी क्षेत्रीय कार्यालय-11 व येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय 05 असे एकूण 88 अनधिकृत जाहिरात फलक आढळून आले आहेत.

### 24 फलक काढले

» या कारवाईत नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत 15, येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय परिसरातील 1, वानवडी रामटेकडी क्षेत्रीय कार्यालय परिसरातील 3, हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालय परिसरातील 5 असे एकूण 24 फलक पाडण्यात आले आहे. ही कारवाई सुरूच राहणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली.

### कारवाई पुढे सुरूच राहील

» गेल्या दोन ते तीन वर्षांत अवकाळी पाऊस तसेच पूर्वमोसमी पावसामुळे शहरात होर्डिंग्ज पडण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे महापालिकेने अनधिकृत होर्डिंग्ज विरोधातील कारवाई तीव्र केली आहे. अनधिकृत होर्डिंग्जचा सातत्याने शोध घेतला जात असून, अनधिकृत होर्डिंग्जविरोधातील कारवाई पुढे सुरूच राहील, असे विभागाचे उपायुक्त संतोष वारूळे यांनी सांगितले.

# पुणे महानगराच्या विकासाचा आता नियोजनबद्ध विस्तार

## ‘ग्रोथ हब’च्या नियोजनाची तयारी; ‘यशदा’कडे आराखड्याची जबाबदारी

**पुणे | प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये विकास केंद्र अर्थात ग्रोथ हब प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर आता पुणे महानगर प्रदेश क्षेत्र (पीएमआर) ग्रोथ हब म्हणून विकसित करण्याची राज्य शासनाची तयारी सुरू झाली आहे. पुण्यामध्ये आयटी कंपन्या, कारखाने, मेट्रो, रिंग रोड, औद्योगिक कॉरिडॉर्स आणि जागतिक दर्जाच्या शैक्षणिक सुविधा असल्याने ‘पीएमआर’साठी यशदा ही शासकीय संस्था आर्थिक वाढीचे धोरण आणि नियोजन आराखडा तयार करणार आहे.

या संदर्भात यशदा येथे संबंधित सर्व यंत्रणांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच बैठक होणार आहे. या आराखड्याची अंमलबजावणी महापालिका, पीएमआरडीए यांच्यासह अन्य शासकीय यंत्रणा करणार आहेत.

नीती आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मंत्रालयात आयोजित बैठकीत उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी ही माहिती दिली. मुख्य सचिव राजेश कुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख यांच्यासह दृकश्राव्य प्रणालीद्वारे पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, ‘पीएमआरडीए’चे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, ‘यशदा’च्या प्रभारी महासंचालक पवनीत कौर, निबंधक राजीव नंदकर या वेळी उपस्थित होते.

केंद्र सरकारने २०२४ च्या अर्थसंकल्पात १४ ग्रोथ हब शहरांच्या विकासाची घोषणा केली. पहिल्या टप्प्यात मुंबई महानगर प्रदेश क्षेत्र, सुरत (गुजरात), वायझॅग (आंध्र प्रदेश), वाराणसी (उत्तर प्रदेश) या चार शहरी क्षेत्रांत ही संकल्पना राबविण्यात येत आहे. यामध्ये मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. त्यानंतर पुणे महानगर प्रदेश क्षेत्रात ग्रोथ हब प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

‘शहराचे सकल उत्पन्न ४.२ लाख कोटी रुपये असून, २०३० पर्यंत १५ ते १८ लाख नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत. यामध्ये किमान सहा लाख महिला कामगार असतील, असे नियोजन करण्यात येणार असल्याने देशात सर्वांत प्रथम आर्थिक विकास आराखडा स्वीकारणाऱ्या शहरात पुण्याचा समावेश असेल. त्यामुळे सर्व संबंधित यंत्रणांनी सध्या सुरू असलेल्या विविध प्रकल्पांतील कामाचे सातत्य ठेवावे,’ अशी सूचना अजित पवार यांनी केली.

### ‘ग्रोथ हब’साठी पुणे नवप्रवर्तन केंद्र

» ‘माहिती तंत्रज्ञान, एआय, इलेक्ट्रिक वाहन, क्लीन टेक, सेमीकंडक्टर डिझाइन क्षेत्रांतील कंपन्या पुण्यात आहेत. तसेच, एमआयडीसी क्षेत्रांमध्ये (चाकण, तळेगाव, रांजणगाव) ऑटोमोटिव्ह, एअरोस्पेस, प्रीसिजन इंजिनीअरिंग आणि फार्मा क्लस्टरचा विस्तार होत आहे. मेट्रो आणि रिंग रोड कॉरिडॉरसह नवीन टाउनशिप असल्याने हरित आणि स्मार्ट नागरीकरणास पोषक वातावरण आहे. पुण्यात पर्यटनासाठी वाव असल्याने वारसा पर्यटन, कृषी पर्यटन, आध्यात्मिक सर्किट, ॲडव्हेंचर झोन्ससाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. याशिवाय कौशल्य प्रमाणपत्र, स्टार्टअप गुंतवणुकीसाठी व्यवसाय सुलभतेमध्ये सुधारणा करण्यात येणार असल्याने परदेशी गुंतवणुकीतही वाढ होणार आहे,’ असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले.

# सांगवी, भोसरी रुग्णालयात सुविधांची वानवा

## रुग्णांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे, अथवा महापालिकेची इतर रुग्णालये किंवा खासगी रुग्णालयाचा आधार घ्यावा लागत आहे



**पिंपरी | प्रतिनिधी**

नागरिकांच्या आरोग्य सुविधांसाठी महापालिकेने शहरात रुग्णालये उभारली आहेत. येथील आरोग्य सुविधांचा नागरिकांना फायदा होत असला तरी सांगवी आणि भोसरीतील नवीन रुग्णालयात मात्र सुविधांची वानवा दिसत आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या रुग्णांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. अथवा महापालिकेची इतर रुग्णालये किंवा खासगी रुग्णालयाचा आधार घ्यावा लागत आहे.

महाालिकेच्या जुनी सांगवी रुग्णालय लोकसंख्येच्या तुलनेत अपुरे पडत आहे. येथे दररोज साधारणत: दीडशे ते दोनशे रुग्ण उपचारासाठी येतात. जुनी सांगवी, दापोडी, पिंपळे गुरव आदी परिसरातील नागरिक उपचारासाठी येतात. अपुऱ्या जागेमुळे रुग्णांची मोठी तारांबळ होते. सोळा खाटांची क्षमता असलेल्या रुग्णालयात स्त्रीरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, ओपीडी, वैद्यकीय अधिकारी आहेत. ओपीडीमध्ये गरोदर महिला, मुले, ज्येष्ठ नागरिक यांच्यावर उपचार आणि लसीकरणाची सुविधा आहे

रुग्णालय जुने असल्याने तसेच वाढत्या लोकसंख्येच्या मानाने येथे सुविधांमध्ये वाढ केलेली नाही. अपुऱ्या जागेमुळे रुग्णांसमवेत आलेल्या नातेवाईकांना आपली वाहने प्रवेशव्दाराबाहेर रस्त्याकडेला उभी करावी लागतात. लसीकरण मोहीम किंवा इतर सार्वजनिक आरोग्य कार्यक्रम राबविताना येथे वाहतूक कोंडीच्या त्रासाला सामोरे जावे लागते. मुख्य रस्ता असल्याने वाहनांची या रस्त्यावरुन मोठी वर्दळ असते.

रुग्णालयात ओपीडीसाठी जागा अपुरी आहे. त्यामुळे रुग्णालयात रूग्णांची आणि नातेवाईकांची गर्दी झाल्यावर बसण्यास जागा नसते. अपुऱ्या जागेमुळे कर्मचाऱ्यांची, रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची दमछाक होते. रुग्णालयात कायमस्वरूपी कर्मचारी कमी आहेत. त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते. मात्र, हे कंत्राटी कर्मचारी सारखे रुग्णालय बदलत असल्याने याठिकाणी कर्मचाऱ्यांची कमतरता जाणवते. परिणामी कायमस्वरूपी असणाााया कर्मचाऱ्यांवर ताण पडतो. वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्याशी संपर्क केला असता, संपर्क होवू शकला नाही.

### नवीन भोसरी रुग्णालयातदेखील समस्या

» शंभर खाटांची क्षमता असलेले आणि कोट्यावधी रूपये खर्च करून नव्याने बांधण्यात आलेले भोसरी रुग्णालयात गैरसोयींची भर पडत आहे. याठिकाणी भोसरी, मोशी, चऱ्होली, डुडुळगाव, धावडेवस्ती या ठिकाणचे नागरिक उपचारासाठी येतात. तसेच, याठिकाणी एमआयडीसी असल्याने दाट लोकवस्ती आहे. यामुळे रूग्णांचा सतत ओघ याठिकाणी असते.रुग्णालयात प्रसुतीगृहासाठी 60 बेड आहेत. 30 बेड मेडिसीनचे, 10 बेड आयसीयू आहेत. 5 बेड एनआयसीयू आहे. सोनोग्राफी, एक्स-रे, लसीकरण, कुटुंबकल्याण, रक्त तपासणी, शस्त्रक्रिया विभाग आहे. तसेच, नर्सिंग स्टाफ, फिजिशियन, चेस्ट फिजिशियन आहे.

### सांगवी रुग्णालयात सोनोग्राफी नाही

» या रुग्णालयात फक्त गरोदर महिलांना दाखल केले जाते. गरोदर महिलांना दर महिन्याला सोनोग्राफी करावी लागते. मात्र, याठिकाणी सोनोग्राफी मशीन नसल्याने येथे येणाऱ्या रुग्णांना पालिकेच्या इतर रुग्णालयात जावून किंवा खासगी सोनोग्राफी केंद्राकडे धाव घ्यावी लागते.

### आयसीयू अन् एनआयसीयू नाही

» या रुग्णालयात अतिजोखमीच्या गरोदर महिलां प्रसुतीसाठी आल्यास येथे आयसीयूची सुविधा नाही. तसेच, जन्मजात बालकाला एनआयसीयूची गरज लागते, अशावेळी वायसीएम किंवा थेरगाव रुग्णालयात पाठविले जाते. रुग्णालयात फक्त गायनिक सर्जरी होते. सर्जिकल वॉर्ड आणि सर्जिकल आयसीयू नाही. तसेच, सर्जन नसल्याने इतर प्रकारच्या जनरल सर्जरी होत नाही. त्यामुळे अपघातग्रस्त व्यक्तींना ठेवण्याची कोणतीही व्यवस्था नाही.

# चिंचवडगाव येथील क्रांतीवीर चापेकर स्मारकाचा होणार पुनर्विकास

## पिंपरी-चिंचवड महापालिका आणि क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती यांच्या माध्यमातून चिंचवडगाव येथील क्रांतिवीर चापेकर स्मारकाचा पुनर्विकास करण्यात आला आहे



**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका आणि क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती यांच्या माध्यमातून चिंचवडगाव येथील क्रांतिवीर चापेकर स्मारकाचा पुनर्विकास करण्यात आला आहे. या स्मारकासाठी महापालिकेने 'क्रांतिवीर चापेकर भारतीय वारसा दर्शन संस्थान' या नावाने स्वतंत्र कंपनी स्थापन करण्यांचा निर्णय घेतला आहे. तसेच, महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली १२ जणांचे संचालक मंडळही निश्चित करण्यास स्थायी सभेत मान्यता देण्यात आली.

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासामध्ये क्रांतीवीर चापेकर बंधूंचे कार्य अनन्यसाधारण आहे. त्यांच्या कार्याचे स्मरण राहावे. नव्या पिढीला स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातून प्रेरणा मिळावी. च्यात देशप्रेमाची जागृती वाढवावी. भारतीय संस्कृतीचा ठेवा जतन व्हावा. या उद्देशाने क्रांतिवीर चापेकर बंधू संग्रहालयाची निर्मिती चापेकर वाडा येथे केली आहे. त्याचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यानंतर स्मारकाच्या व्यवस्थापनाबाबत स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार प्रशासक शेखर सिंह यांनी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू करणे व त्यासाठी गिरीश परळीकर यांची कंपनी सचिव म्हणून नेमणूक करण्यास स्थायी समिती व महापालिका सभेची मान्यता दिली. तसेच, चापेकर वाडा येथील संग्रहालयाचे दैनंदिन कामकाज, आवश्यक सोयी-सुविधा पुरविणे, वेबसाईट तयार करणे, ऑनलाइन तिकीट बुकिंग व पेमेंटची व्यवस्था करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

या प्रस्तावासोबत 'क्रांतिवीर चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालय' प्रवेशशुल्क निश्चित करण्यात आले. त्यानुसार दर प्रती व्यक्ती वयोमर्यादा ३ वर्षांपर्यंत मोफत, ३ ते १८ वर्षे रक्कम ५० रुपये, १८ वर्षे ते पुढील वयोगटासाठी रक्कम १०० रुपये दर असतील.

### असे असेल संचालक मंडळ

» यामध्ये पदसिद्ध अध्यक्ष म्हणून महापालिका आयुक्त असतील. यासह विद्यमान महापौर, स्थायी समिती अध्यक्ष, विरोधी पक्ष नेता हे संचालक असणार आहे. हे पदाधिकारी नसल्याने ही पदे रिक्त राहिली आहेत. मात्र, सद्यस्थितीत पालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन, शहर अभियंता मकरंद निकम, क्रीडा उपायुक्त पंकज पाटील, कायदा सल्लगार राजेश आगळे, क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीने सुचवलेले ३ प्रतिनिधी - पद्मश्री गिरीष प्रभुणे, मिलिंदराव देशपांडे, सतीश गोरडे यांची संचालक म्हणून नेमणूक केली आहे.

# दुष्काळी अणे पठार आता पाणीदार

## डच बँकेच्या अर्थसहायातून जलसंसाधन विकास व व्यवस्थापन प्रकल्पाच्या अंतर्गत निवड करण्यात आली असून त्या अंतर्गत ही गावे पाणीदार होत आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

गेले वर्षभरापासून वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट (वॉटर) संस्थेमार्फत अणे पठार भागातील अणे, आनंदवाडी, पेमदरा, नळावणे,शिंदेवाडी गावाची डच बँकेच्या अर्थसहायातून जलसंसाधन विकास व व्यवस्थापन प्रकल्पाच्या अंतर्गत निवड करण्यात आली असून त्या अंतर्गत ही गावे पाणीदार होत आहेत.

गेल्या वर्षभरापासून वॉटर संस्थेने अणे पठार भागावर काम करत असताना जलसंधारणाच्या दृष्टीने एक ठोस पाऊल उचलत आतापर्यंत 10 सिमेंट बंधारे 2 गाबियन बंधारे, 15 नाला, तलाव खोलीकरणाची कामे केली आहे. ही कामे करत असताना शेतकरी बांधवांना सेंद्रिय शेती करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी 100 शेतकरी बांधवांना गांडुळखत बेड वाटप, 30 शेतकरी बांधवांना सेंद्रिय द्रावण बनविण्यासाठी बॅरल, चिकट सापळे, ठिबक सिंचन, तुषार सिंचन वापरणाऱ्या 50 लाभार्थ्यांना प्रोत्साहनपर अनुदान अशी जवळपास एक ते दीड कोटी रुपयांची कामे अणे पठार भागावर झाली असून सद्यःस्थितीमध्ये देखील संस्थेच्या वतीने पठार भागावर विविध जलसंधारणाची कामे सुरू आहे.



### प्रकल्प लोकसहभागावर...

» हा प्रकल्प लोकसहभागावर आधारित आहे. या प्रकल्पात प्रामुख्याने जलसंधारणाची कामे केली जातात. यामध्ये सिमेंट बंधाऱ्याचे बांधकाम करणे, जुन्या बंधाऱ्याची दुरुस्ती करणे, जुन्या बंधाऱ्यातील गाळ काढणे, नाला खोलीकरण, जाळी बंधारे, कोरवाल बंधारे तसेच लाभार्थी गटाची स्थापना करणे, सूक्ष्म व तुषार पद्धतीचा अवलंब करणे, सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देणे, प्रशिक्षण व मार्गदर्शन आदी उपक्रम संस्थेमार्फत प्रकल्पामध्ये राबवण्यात येत आहेत.

आनंदवाडी येथे वॉटर संस्था व यमाईमाता शेतकरी गटाच्या माध्यमातून सामूहिक गांडूळखत निर्मिती प्रकल्प तसेच अणे येथे सामूहिकटेन ड्रम थिअरी तंत्रज्ञान प्रकल्प प्रगतीपथावर आहे. या कामांच्या माध्यमातून दुष्काळी अणे पठार भागावरील पाणी पातळीत वाढ होण्यास मदत झाली असून त्याचा प्रत्यय या वर्षातील उन्हाळ्यात एप्रिल महिन्यापर्यंत अणे येथील बंधाऱ्यांमध्ये साठलेल्या पाण्याच्या माध्यमातून दिसून आला. भविष्याचा वेध घेऊन दुष्काळी अणे पठार भागावर वॉटर संस्थेने आगामी 5 वर्षाचा जलसंधारणाचा आराखडा तयार करून शाश्वत काम केले तर कायमस्वरूपी दुष्काळी समजला जाणारा पठार बाग हा पाणीदार,बागायती पठार भाग ओळखला जाईल अशी अपेक्षा पठारावरील शेतकऱ्यांनी केली आहे.

> “ अणे पठार दुष्काळग्रस्त असून आमच्या पठारावरील पाणी आमच्याच शेतकऱ्याला वापरता येण्यासाठी वॉटर शेडमार्फत ग्रामपंचायतने सर्व्हे केला. त्यानुसार पठारावर अनेक बंधारे झाले आहेत. जवळपास दीड कोटी रुपयांची कामे अणे पठार भागावर झाली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. पठारावरील शेतकऱ्यांना पाणीदार करण्याचा आमचा संकल्प वॉटर शेडच्या माध्यमातून पूर्ण होत आहे.
>
> **- प्रियांका दाते, सरपंच अणे**

> “ माझ्या शेतातील गट क्र.672मध्ये वॉटर संस्थेच्या माध्यमातून गेल्यावर्षी जो सिमेंट बंधारा निर्माण झाला. चालू वर्षी झालेल्या पावसाने हा बंधारा पूर्णपणे भरला गेला आहे. या बंधाऱ्याने परिसरातील अनेक विहिरी तसेच बोअरवेल याची पाणी पातळी वाढली असून यावर्षी हा पाणीसाठा एप्रिल मे पर्यंत राहील अशी अपेक्षा आहे.
>
> **- शरद दाते, शेतकरी आणे**

> “ वॉटर संस्थेच्या सहकार्याने आगामी 5 वर्षात दुष्काळी पठार भाग पाणीदार करत असताना शेतकरी वर्गाला सेंद्रिय शेतीसाठी प्रोत्साहित करणार.
>
> **- माऊली संभेराव, स्थानिक शेतकरी**

# घोडेगाव शहरात व्यापारी संकुल उभारणार : वळसे पाटील

## स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळावी, यासाठी पंचायत समितीच्या जागेत व्यापारी संकुल उभारले जाणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

घोडेगाव (ता. आंबेगाव) शहरातील व्यापाऱ्यांना व्यवसायवृद्धीसाठी प्रोत्साहन मिळावे, तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळावी, यासाठी पंचायत समितीच्या जागेत व्यापारी संकुल उभारले जाणार आहे. माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी ही माहिती दिली.

पंचायत समितीच्या सभागृहात झालेल्या बैठकीत घोडेगावमधील प्रलंबित प्रश्न व नवीन कामांबाबत चर्चा झाली. या वेळी वळसे पाटील बोलत होते.

वळसे पाटील म्हणाले, 'घोडेगाव हे तालुक्याचे ठिकाण असून येथे सातत्याने वर्दळ असते. भीमाशंकरला जाणारे पर्यटकही या शहरातून जातात. त्यामुळे व्यापार वाढीस संधी असून पंचायत समितीच्या जागेत व्यापारी संकुल उभारल्यास स्थानिक व्यापाऱ्यांना मोठा फायदा होईल. या जागेत सध्या असलेले ग्रामीण रुग्णालय लवकरच नवीन ठिकाणी स्थलांतरित होणार असून त्यानंतर संकुलाचे काम हाती घेण्यात येईल.'

तसेच घोडेगावमधील कचऱ्याचा प्रश्नही गंभीर असून त्यासाठी खाजगी कंपनीमार्फत विल्हेवाट लावण्याची सूचना वळसे पाटील यांनी केली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत योग्य उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.



### घोडेगाव नगरपंचायतीची मागणी

» ग्रामसभेत घोडेगावसाठी नगरपंचायत स्थापनेची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. त्यावर ग्रामस्थांची इच्छा असल्यास नगरपंचायत स्थापन केली जाईल, असे वळसे पाटील यांनी सांगितले. तसेच महसूल भवनच्या जागेत अभ्यासिका सुरू करावी, जुन्नर फाटा ते चिंचोली आणि मंचर ते घोडेगाव रस्त्याचे रुंदीकरण आणि शहरालगतच्या दोन्ही ओढ्यांना संरक्षक भिंती व स्वच्छतेची कामे करण्याबाबतच्या सूचनाही वळसे पाटील यांनी संबंधितांना दिल्या.

शहरातील व्यापाऱ्यांना व्यवसायवृद्धीसाठी प्रोत्साहन मिळावे, तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळावी, यासाठी पंचायत समितीच्या जागेत व्यापारी संकुल उभारले जाणार आहे. माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी ही माहिती दिली. ग्रामस्थांची इच्छा असल्यास नगरपंचायत स्थापन केली जाईल, असे वळसे पाटील यांनी सांगितले. तसेच महसूल भवनच्या जागेत अभ्यासिका सुरू करावी, जुन्नर फाटा ते चिंचोली आणि मंचर ते घोडेगाव रस्त्याचे रुंदीकरण आणि शहरालगतच्या दोन्ही ओढ्यांना संरक्षक भिंती व स्वच्छतेची कामे करण्याबाबतच्या सूचनाही वळसे पाटील यांनी संबंधितांना दिल्या.